कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमाची प्रचार प्रसिद्धी होण्यासाठी तालुका स्तरावर महिला मेळावे तसेच स्टेक होल्डर्सची कार्यशाळा आयोजित करण्यासाठी तालुकानिहाय निधी उपलब्ध करुन देणेबाबत. (लेखाशिर्ष (२२३५-ए- ९०१)

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निणर्य संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१७८/का-२

नवीन प्रशासकीय इमारत, ३ रा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई
दिनांक: २५ सप्टेंबर, २०१९

वाचा :-

१. आयुक्त महिला व बाल विकास यांचे पत्र जा.क्र.मबाविआ/कौहिमसं/का-६/जाप्र२०.२१/४२००/ दि. २२.०८.२०१९ .
२. वित्त विभाग/ शासन परिपत्रक क्रमांक-अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९
३. वित्त विभाग/ शासन परिपत्रक क्रमांक-अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ०८.०७.२०१९

प्रस्तावना :-

उपरोक्त संदर्भाधीन क्र. १ च्या पत्रान्वये आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी सादर केलेल्या कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण या अधिनियमांतर्गत, असणाऱ्या तरतूदींचा प्रचार व प्रसिद्धी करण्यासाठी प्रत्येक तालुक्यामध्ये महिला मेळावे व स्टेक होल्डर्सची (अधिनियमांचा अंमलबजावणी करणारी यंत्रणा) कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. सदर कार्यशाळेसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण या अधिनियमांतर्गत, असणाऱ्या तरतूदींचा प्रचार व प्रसिद्धी करण्यासाठी प्रत्येक तालुक्यामध्ये महिला मेळावा व स्टेक होल्डर्स कार्यशाळेसाठी अनुक्रमे रु. ३५००/- व रु. ३०००/- याप्रमाणे एकुण रु. ६५००/- इतका खर्च येणार आहे. त्यानुसार एकुण ३७६ तालुक्यांसाठी (३५८ तालुके + १५ वॉर्डस) एकुण रु. २४,४४,०००/- (चोवीस लाख चव्वेचाळीस हजार फक्त) इतके आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना या शासन निर्णयाद्वारे वितरित व खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. या कार्यक्रमांतर्गत होणारा खर्च मागणी क्रमाक एक्स - १, लेखाशिर्ष २२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण ,सामाजिक आधार ०२ समाजकल्याण ००१ संचालन व प्रशासन (०१) (०५) जनजागृती प्रसिध्दी, प्रशिक्षण आणि मुल्यमापन (२२३५-ए- ९०१), २६ जाहिरात व प्रसिद्धी, योजनांतर्गत योजना या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा. तसेच सदर लेखाशिर्षाखाली खर्च करण्यात आलेल्या उपरोक्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

३. हा शासन आदेश वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र. २ व ३ अन्वये प्रशासकीय विभागास दिलेल्या अधिकारांस अनुसरुन निर्गमित करण्यात येत असून, सदर निधी खर्च करताना वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्ती तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ अन्वये खर्च होईल याची दक्षता आयुक्त, महिला व बाल विकास पुणे यांनी घेण्यात यावी.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.१ येथील शासन परिपत्रक क्रमांक-अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९ च्या परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागांस दिलेल्या अधिकारांस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०९२५११५२४४२१३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Smita Dattatray Nivatkar

Digitally signed by Smita Dattatray Nivatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women and Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fa46cf1e928518ffc98619187a1ef6de2dd57c16934e9cb6672cc02aa258b08, serialNumber=f9bd2a7c214922f8f4939e80711ece461c9dfd9c679b28f98e79475c5ea90e21, cn=Smita Dattatray Nivatkar
Date: 2019.09.25 11:54:06 +05'30'

(स्मिता निवतकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे.
२. विभागीय आयुक्त, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, (आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, यांचेमार्फत.)
३. महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई शहर / मुंबई उपनगर
५. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
७. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.महाराष्ट्र राज्य (क्र.२ ते ८ यांना आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, यांचेमार्फत.)
८. निवड नस्ती.